गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

● वर्ष १ ले ● अंक ३१६ वा ● शनिवार ०६ एप्रिल २०२४ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| * Volume 1 | Issue 316 | Date : 06/04/2024 blow Saturday Page 4 Price 4

# ३० लाख युवकांना नोकरी, महिलांना वर्षाला १ लाख ते शेतीमालाला हमीभाव; काँग्रेसच्या जाहीरनाम्यात मोठ्या घोषणा



नवी दिल्ली/वृत्तसंस्था : आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्र्वभूमीवर काँग्रेसकडून आज जाहीरनामा प्रसिद्ध करण्यात आला. काँग्रेसचा हा जाहीरनामा पाच 'न्याय' आणि २५ 'गॅरंटी'वर आधारित आहे. काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, राहुल गांधी, सोनिया गांधी यांनी दिल्लीत पत्रकार परिषद घेत हा जाहीरनामा प्रसिद्ध केला. यात ३० लाख सरकारी नोकऱ्या आणि तरुणांना एक वर्षासाठी प्रशिक्षणार्थी कार्यक्रमांतर्गत १ लाख रुपये देण्याच्या आश्र्वासनांचा समावेश आहे. जात जनगणना आणि आरक्षणाची ५० टक्के मर्यादा रद्द करण्याची गॅरंटी काँग्रेसने दिली आहे. तसेच, 'किसान न्याय' अंतर्गत, पक्षाने किमान आधारभूत किंमत, कर्जमाफी आयोगाची स्थापना आणि जीएसटी मुक्त शेतीला कायदेशीर दर्जा देण्याचे आश्र्वासनही दिले आहे.अग्निवीर योजना बंद करून जुनी भरती योजना सुरू करण्याचे आश्र्वासन देण्यात आले आहे. गरीब महिलांना १ लाखाच्या मदतीचे आश्वासन देण्यात आले आहे.

**काँग्रेसच्या जाहीरनाम्यातील प्रमुख मुद्दे पुढीलप्रमाणे**

✻ ३० लाख नोकऱ्या देण्याचे आश्वासन दिले जाईल ✻ पहिल्या पक्की नोकरीचे वचन. युवा स्टार्टअप फंड रु. ५००० कोटी. ✻ युवाकेंद्री असेल ✻ बेरोजगार भत्त्यासारख्या योजनांमध्ये चांगले पैसे थेट खात्यात देण्याचे आश्र्वासन देणार हा मुद्दा काँग्रेस । **पान २ वर**

## छानणी नंतर नांदेड लोकसभा मतदारसंघासाठी ६६ उमेदवार पात्र तर ८ अपात्र




नांदेड : नांदेड लोकसभा निवडणुकीच्या छाननीमध्ये ६६ उमेदवार पात्र ठरले आहेत. तर ८ उमेदवार अपात्र ठरले आहेत. ८ एप्रिलला दुपारी ३ वाजेपर्यंत उमेदवारी अर्ज परत घेता येणार आहेत. त्यामुळे ८ एप्रिल नंतर १६-नांदेड लोकसभा मतदारसंघामध्ये अंतिम उमेदवारी निश्र्चित होणार आहे.

तत्पूर्वी आज जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी सर्वसाधारण निरीक्षक शशांक मिश्र यांच्यासह प्रशासनातील वरिष्ठ अधिका-यांसोबत नियोजन भवनामध्ये झालेल्या बैठकीत अर्ज रद्द करतांना उमेदवार व त्यांच्या प्रतिनिधींशी संवाद साधला. कोणत्या कारणाने त्यांचे उमेदवारी अर्ज रद्द होत आहेत याबद्दलची माहिती दिली. चुकीचे प्रतिज्ञापत्र, सूचकांची संख्या, सुरक्षा रक्कम जमा न करणे आदी करणांवरून ९ अर्ज रद्द करण्यात आले. एका इच्छूक उमेदवाराचे दोन अर्ज रद्द झाले. काल पर्यंत ९२ अर्ज दाखल झाले होते. ९ अर्ज आज रद्द करण्यात आले. ६६ उमेदवारांनी हे अर्ज दाखल केले होते. काही उमेदवारांनी एकापेक्षा अधिक अर्ज दाखल केले होते.

**अपात्र उमेदवार** अपात्र ठरलेल्या उमेदवारांमध्ये विष्णु मारूती जाधव, अलिमोद्दीन मोहियोद्दीन काझी सय्यद, माधवराव मुकिंदा गायकवाड, आनंदा धोंडिबा जाधव, सुरेश दिगांबर कांबळे, दिगांबर धोंडिबा वाघमारे, आनंदा पुंडलिकराव वाघमारे, सोपान नवेल पाटील यांचा समावेश आहे.

**पात्र उमेदवार** चिखलीकर प्रतापराव गोविंदराव (भाजप), पांडुरंग रामा अडगुळवार (बहुजन समाज पार्टी), वसंतराव बळवंतराव चव्हाण (इंडियन नॅशनल काँग्रेस), अब्दुल रहीम अहमद (देश जनहित पार्टी), अविनाश विश्र्वनाथ भोसीकर (वंचित बहुजन आघाडी), कौसर सुलताना (इंडियन नॅशनल लीग), राहुल सुर्यकांत एंगडे (बहुजन मुक्ती पार्टी), रुक्मिणीबाई शंकरराव गीते (भारतीय प्रजा सुराज्य पक्ष), शेख मोईन शेख रशीद (ऑल इंडिया मजलिस ए इन्कलाब ए मिल्लत), सय्यद तनवीर (बहुजन महा पार्टी), सुशीला निळकंठराव पवार । **पान २ वर**

## भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर मध्यवर्ती जयंती उत्सव विश्वस्त समितीच्या वतीने पोलिस आयुक्त व महापालिका आयुक्तांना निवेदन



सोलापूर/प्रतिनिधीः सालाबाद प्रमाणे यंदाच्याही वर्षी विश्र्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३ व्या जयंती निम्मित भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर मध्यवर्ती जयंती उत्सव विश्र्वस्त समितीच्या वतीने सोलापूर चे पोलिस आयुक्त व महापालिकेचे उपआयुक्त यांना निवेदन देण्यात आले, सदर निवेदन हे १४ एप्रिल ते २१ एप्रिल पर्यंत मिरवणुकीचा सप्ताह ठरविण्यात आला असून, २१ एप्रिल रोजी रात्री १० ऐवजी मध्यरात्री १२ वाजे पर्यंत मिरवणुकीस परवानगी मिळावी,जयंती । **पान २ वर**

### भारत पुढील तीन वर्षांत जगातील तिसरी मोठी अर्थव्यवस्था बनेल

नवी दिल्ली भारत पुढील तीन वर्षांत जगातील तिसरी मोठी अर्थव्यवस्था बनेल, असा ठाम विश्वास केंद्रीय माहिती प्रसारण आणि क्रीडा व युवक कल्याणमंत्री अनुराग ठाकूर यांनी व्यक्त केला. दहा वर्षांपूर्वी भारत अर्थव्यवस्थेबाबत अकराव्या स्थानावर होता. मोदी सरकारच्या कार्यकाळात आपला देश पाचव्या क्रमांकावर आला असल्याचे त्यांनी सांगितले. ठाकूर यांनी गुरुवारी १९ देशांमधील ३१ प्रमुख शहरांच्या १४७ अनिवासी भारतीय नेत्यांशी दूरदृश्यप्रणालीद्वारे संवाद साधला. एनआरआयएमच्या मुख्य सदस्य कांचन बॅनर्जी यांनी हा कार्यक्रम आयोजित केला होता. ते म्हणाले की, यंदाची लोकसभा निवडणूक विकसित भारताचे स्वप्न साकारण्यासाठी महत्त्वपूर्ण आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात २०४७ साली भारत निश्चितपणे विकसित राष्ट्र बनणार आहे. गेल्या १५ वर्षांपासून रेल्वे, रस्ते आणि उड्डाणपुलांच्या योजना रखडल्या होत्या. मोदी सरकारने त्या पूर्ण केल्या आहेत.

## रिपाइं आठवले गटाच्या वतीने महावितरण अक्कलकोट यांना निवेदन

**एकीकडे शासन वारंवार सांगत आहे घराच्या बाहेर पडू नका चाळीस-पंचेचाळीस डिग्री तापमान असल्यामुळे प्रत्येकाने आपापले काळजी घ्यावी असे शासनाने वारंवार नागरिकांना टीव्ही प्रसार माध्यमातून आव्हान करत आहे तरी अक्कलकोट महावितरण कंपनी याचे गांभीरपूर्वक विचार करत नाही याची खंत वाटते असे मत रिपाइं तालुका अध्यक्ष मडिखांबे यांनी व्यक्त केले**



अक्कलकोट/प्रतिनिधीः अक्कलकोट शहराला २४ तास वीज पुरवठा करण्याबाबत रिपाइं आठवले गटाच्या वतीने महावितरण अक्कलकोट कार्यालयास निवेदन देण्यात आले सध्या उन्हाळ्याचे दिवस असल्यामुळे तसेच उन्हाचा पारा दिवसेंदिवस अधिकच तीव्र होत चाललेला आहे त्यामुळे उष्मघातेचे रुग्ण वाढत आहेत त्याचे शहरातील लोकांच्या आरोग्यावर परिणाम होत आहे त्यामुळे आपल्या महावितरणाचे वीज पुरवठा खंडित न करता । **पान २ वर**

## निवडणुका निर्भय, निपक्षपणे पार पाडण्यासाठी सर्वांनी दक्षतापूर्वक काम करावे

### विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार



सोलापूर/प्रतिनिधीः भारत निवडणूक आयोगाने लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ चा निवडणूक कार्यक्रम दिनांक १६ मार्च २०२३ रोजी जाहीर केलेला आहे. यानुसार सोलापूर जिल्ह्यातील सोलापूर व माढा लोकसभा मतदारसंघासाठी दिनांक ७ मे २०२४ रोजी मतदान होऊन दिनांक ४ जून रोजी मतमोजणी होणार आहे. तरी ही निवडणूक प्रक्रिया निर्भय, निष्पक्षपणे पार पाडण्यासाठी निवडणूक कामकाजासाठी नियुक्त अधिकारी-कर्मचाऱ्यांनी अत्यंत दक्षतापूर्वक काम करावे, असे आवाहन विभागीय महसूल आयुक्त डॉ.चंद्रकांत पुलकुंडवार यांनी केले. नियोजन भवन येथील सभागृहात आयोजित निवडणूक कामकाजाचा आढावा प्रसंगी विभागीय आयुक्त डॉ. पुलकुंडवार मार्गदर्शन करत होते. यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, विभागीय सह आयुक्त नगर प्रशासन पुनम मेहता, अपर जिल्हाधिकारी मोनिका सिंग ठाकूर, निवासी उपजिलधिकारी मनीषा कुंभार, उपजिल्हाधिकारी निवडणूक गणेश निऱ्हाळी, उपजिल्हाधिकारी महसूल अमृत नाटेकर, पोलीस शहर उपयुक्त दिपाली काळे, अतिरिक्त पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर यांच्यासह सर्व नोडल अधिकारी उपस्थित होते. विभागीय आयुक्त डॉ पूलकुंडवार म्हणाले की, लोकसभा निवडणुकीसाठी नियुक्त करण्यात आलेले सर्व अधिकारी कर्मचारी यांनी ही निवडणूक यशस्वीपणे पार पाडण्यासाठी परस्परात चांगला समन्वय ठेवावा. निवडणूक कामकाजाचे प्रशिक्षण अत्यंत काटेकोरपणे देऊन संबंधित नियुक्त अधिकारी कर्मचारी यांनी प्रशिक्षणाप्रमाणे कामकाज पार पाडावे. मतदानाची टक्केवारी वाढण्यासाठी स्वीप चे कार्यक्रम अत्यंत प्रभावीपणे राबवून मतदारांमध्ये जनजागृती करावी. सिंगल विंडो सिस्टीम मधून सर्व राजकीय पक्षांना आवश्यक असलेल्या परवानग्या त्वरित देण्याबाबतची कार्यवाही करावी. प्रत्येक मतदान केंद्रावर निवडणूक आयोगाच्या सूचनाप्रमाणे आवश्यक असलेल्या सर्व सोयी सुविधांची खात्री करावी. मतदान करताना एकाही मतदाराला कोणत्याही प्रकारची अडचण येणार नाही याबाबत दक्षता घ्यावी, असेही त्यांनी सुचित केले.

जिल्ह्यात स्वीप अंतर्गत १८ ते १९ वयोगटातील मतदारांची मतदार म्हणून नोंदणी मोठ्या प्रमाणावर झालेली आहे. मतदानाची टक्केवारी वाढवण्यासाठी येथील उद्योजक व्यावसायिक यांच्या स्वतंत्र बैठका घेऊन त्यांच्याकडे काम करणाऱ्या कामगारांना मतदानाच्या दिवशी भर पगारी सुट्टी देण्याबाबत सूचित करण्यात आलेले असून मतदान करणाऱ्या कामगारांचा उद्योजक बोटावरील शाही पाहून सत्कार करणार असल्याची माहिती त्यांनी दिली. निवडणूक आयोगाच्या निर्देशाप्रमाणे सोलापूर व माढा लोकसभा मतदारसंघासाठी आवश्यक असलेला निवडणूक स्टाफ नियुक्त करण्यात आलेला असून त्यासाठी सर्व प्रशिक्षण प्रक्रिया पूर्ण होत आलेली आहे असे ही त्यांनी यावेळी सांगितले. प्रारंभी उपजिल्हा निवडणूक अधिकारी गणेश निराळी यांनी लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने सोलापूर व माढा लोकसभा मतदारसंघासाठी निवडणूक प्रशासनाच्या वतीने करण्यात आलेल्या कामकाजाची माहिती दिली. हे निवडणूक प्रक्रिया यशस्वीपणे । **पान २ वर**

## आमची खरी लढत महाविकास आघाडी बरोबर

### माढा लोकसभा वंचित चे उमेदवार रमेश बारस्कर



पंढरपूर/प्रतिनिधीःमाढा लोकसभा मतदारसंघात वंचित बहुजन आघाडीचे खरे लढत महाविकास आघाडीबरोबर शरद पवार यांच्या राष्ट्रवादीशीच होणार आहे असे विधान करत भाजपचे खासदार रणजीत सिंह नाही त्यामुळे हे तीन नंबरला जातील असा दावा रमेश बारस्कर यांनी केला आहे करमाळ्यात त्यांनी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्र्वभूमीवर

रमेश बारस्कर हे वंचित बहुजन आघाडीचे माढा लोकसभा मतदारसंघातील उमेदवार आहेत या मतदारसंघावर भाजपने खासदार निंबाळकर यांना उमेदवारी जाहीर केले तर महाविकास आघाडीकडून ही जागा राष्ट्रवादी शरद पवार गटाला देण्यात आले आहे पारस्कर यांनी भाजपबरोबर टीकास्त्र सोडले असून लोकसभेचेही वाचवण्यासाठी यावेळी मतदान करण्याची आव्हान त्यांनी केले आहे माढा लोकसभा मतदारसंघाबाबत बोलताना ते म्हणाले की या मतदारसंघात आम्हाला चांगले वातावरण आहे यावेळी आमची लढत ही राष्ट्रवादीची होणार आहे भाजपचे निंबाळकर यांनी कोणतेही काम केलेले नाही ईडीसीआयचा भाग दाखवून माझ्या दबाव आणत आहे मात्र निवडणुकीत मतदार त्यांना जागा दाखवेल

पुढे बोलताना ती म्हणाली की माढा मतदारसंघातील माळशिरस फलटण हे विधानसभा मतदारसंघ राखीव आहेत त्यांचा फायदा आम्हाला होणार आहे हे सांगण्यातच भारतकर यांनी या मतदारसंघातील भारतीय समीकरणे स्पष्ट करून सांगितले आहेत प्रस्थापितांच्या विरुद्धची ही लढाई असून शेतकऱ्यांचे प्रश्र्न सोडवण्यासाठी आम्ही निवडणूक उतरल्या होत असेही त्यांनी शेतकऱ्यांचे सर्वसामान्य नागरिकांना न्याय देण्यात हे सरकार अपेक्षित ठरले आहे शेतकऱ्यांना हमीभाव देण्याच्या वेळी हे सर्व एकत्र बसून निर्णय घेतात मात्र शेतकऱ्यांना चांगला भाव देत नाहीत असेही ते म्हणाले आहे. सध्या । **पान २ वर**

## संपादकीय

### हे त्यांच्या लक्षात आले नाही का?

मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्यावर ईडीने केलेल्या कारवाईनंतर तिहार जेलमध्ये जाण्याची पाळी यावी, हे मोठे दुर्दैव म्हटले पाहिजे. लोकसभा निवडणुकीचे बिगुल वाजल्यानंतर केजरीवाल यांना अटक होऊन त्यांची रवानगी जेलमध्ये झाली. म्हणून इंडिया आघाडीतील पक्षांनी आदळ-आपट सुरू केली आहे. भाजपने विरोधकांना संपविण्याचे कारस्थान रचले आहे, असा टाहो काँग्रेसपासून सर्व भाजपविरोधी पक्ष फोडत आहेत. पण केजरीवाल हे ईडीने नऊ वेळा समन्स बजावूनही चौकशीला सामोरे गेले नाहीत, हे कोणी सांगत नाहीत. केजरीवाल हे मुख्यमंत्री आहेत म्हणून त्यांना कायदा उल्लंघन करण्याचे घटनेने चिलखत दिलेले नाही. दिल्लीच्या आम आदमी पक्षाच्या सरकारमधील तीन मंत्री अगोदरपासूनच जेलमध्ये आहेत. आता केजरीवाल यांची त्यात भर पडली आहे. ऐन निवडणुकीच्या रणधुमाळीत केजरीवाल यांना मोदी सरकारने जेलमध्ये पाठवले म्हणून त्यांना व त्यांच्या पक्षाला थोडी फार सहानुभूती मिळू शकेल, पण कायद्याच्या कचाट्यातून त्यांची सुटका कशी होऊ शकेल? दिल्ली सरकारने बनविलेल्या नवीन मद्य धोरणातून त्यांना व त्यांच्या पक्षाला जवळपास साडेतीनशे कोटी रुपये लाच म्हणून पैसे मिळाले, हा आरोप त्यांना न्यायालयात खोडून काढावा लागेल. केंद्रीय तपास यंत्रणांच्या चौकशीला महाराष्ट्रातले नेतेही सामोरे गेले होते. केजरीवाल यांना ईडीने नऊ वेळा समन्स बजावूनही ते चौकशीला गेले नाहीत. ईडीच्या विरोधात त्यांनी उच्च न्यायालयाचे दरवाजे ठोठावत आपल्या अटकेच्या कारवाईवर स्थगिती द्यावी, अशी मागणी केली होती, आपण ईडीकडे चौकशीला जाण्यास तयार आहोत. पण त्यांनी आपल्याला अटक होणार नाही, असे आश्वासन द्यावे अशी केजरीवाल यांनी कोर्टाकडे मागणी केली होती. उच्च न्यायालयाने त्यांच्या मागण्या फेटाळून लावल्या आणि ईडीचे पथक त्यांच्या निवासस्थानी दरवाजात उभे राहिले. केजरीवाल हे निर्दोष आहेत की ईडीच्या म्हणण्याप्रमाणे मद्य घोटाळ्याचे प्रमुख सूत्रधार आहेत, हे न्यायालय ठरवेल. पण राज्याच्या मुख्यमंत्र्याला त्यांच्या घरी पोलीस आणि ईडीचे अधिकारी येऊन अटक करतात, यातून मुख्यमंत्रिपदाची बेईज्जती होते, हे त्यांच्या लक्षात आले नाही का?

पान १ वरुन

### आमची खरी लढत महाविकास...

राज्यात आमच्या लग्नाचा लग्नाचा प्रश्न गाजत आहे देशभर त्यांच्या बातम्या होत आहेत मात्र याकडे कोणीही लक्ष देत नाही मात्र मी खासदार झाल्याबद्दल तरुणाच्या लग्नाचा विषय संसदेत मांडणार आहे यासाठी एक चांगला कायदा करण्यासाठी प्रयत्न केलेला असल्याने वंचित बहुजन आघाडी माढा लोकसभा मतदारसंघाचे उमेदवार रमेश बारस्कर यांनी करमाळा पत्रकार परभणी पत्रकार परिषदेच्या वेळी वंचिताचे जिल्हा उपाध्यक्ष सुभाष मोहाळ निवासी जिल्हाध्यक्ष साहेबराव वाघमारे जिल्हा संघटक हवामान सहसचिव प्रवीण वाघमारे जालिंदर गायकवाड शहराध्यक्ष विशाल लोंढे विकास कांबळे तालुकाध्यक्ष नवनाथ साळवे उपाध्यक्ष अजय पवार नंदू कांबळे युवाचे तालुका दे जनार्दन उबाळे गणेश कांबळे समता परिषद तालुका शिवाजी बनकर बळीराजा शेतकरी संघटनेचे अण्णासाहेब शुभमवार महावीर पोळ सचिन गोडसे लक्ष्मण भालेराव संतोष पवार संभाजी कांबळे आधी जन्म मोठ्या संख्येने उपस्थित होते

### निवडणुका निर्भय, निपक्षपणे पार

पार पाडण्यासाठी २६ नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आलेली असून प्रत्येक नोडल अधिकाऱ्यावर विशेष जबाबदारी सोपवली असून त्यांचे कामकाज व्यवस्थितपणे सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. आदर्श आचारसंहिता कक्ष, स्वीप कार्यक्रम, सिंगल विंडो सिस्टीम, मीडिया कक्ष, जिल्हास्तरीय माध्यम व प्रमाणीकरण संनियंत्रण समिती, प्रशिक्षण व्यवस्थापन, साहित्य व्यवस्थापन पोस्टल बॅलेट अदींचे कामकाज व्यवस्थितपणे सुरू असल्याचे ही त्यांनी सांगितले.

### रिपाइं आठवले गटाच्या वतीने

२४ तास दिवस असो किंवा रात्र असो कायमस्वरूपी वीज पुरवठा अखंडित राहीला पाहिजे की जेणेकरून सर्व शहरवासीयांना या उन्हाच्या तीव्रते पासून वाचण्यासाठी निदान घरांमध्ये दुकानांमध्ये किंवा अन्य ठिकाणी पंखे कुलर ए सी चालू ठेवण्याकरिता वीज पुरवठा चालू पाहिजे अन्यथा अंगाची लाहीलाही होऊन उष्माघाताने जीवित हानी होण्याची शक्यता आहे या बाबीचा गंभीर्याने विचार करून अक्कलकोट शहराला २४ तास वीज पुरवठा करण्यात यावे असे निवेदन द्वारे विनंती करण्यात आली आहे यावेळी रिपाइं शहर अध्यक्ष अजय मुकणार, सरचिटणीस शुभम मडिखांबे,दशरथ मडिखांबे,आकाश मडिखांबे,भीम मडिखांबे आदी उपस्थित होते

# नुसत्या राजकीय स्वातंत्र्याने जनतेचे कल्याण होईल हा भ्रम आहे : डॉ.आंबेडकर

## नुसत्या राजकीय स्वातंत्र्याने जनतेचे कल्याण होईल, हा भ्रम आहे. या विषयावर वैचारीक प्रबोधनात्मक ३८ वी कार्यशाळा संपन्न

छत्रपती संभाजी नगर :समाज जीवनात कार्यरत फुले शाहू आंबेडकराईट विचारधारेच्या हितचिंतकांना जागृत करून वैचारिक आंदोलनाचा कारवाँ पुढे घेऊन जाण्यासाठी समग्र आंदोलन समजून घेत असताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी वेळोवेळी घेतलेल्या भूमिका आणि त्यावेळी व्यक्त केलेले विचार समजून घेणे आवश्यक आहे. आपण सर्वांना ज्ञात आहेच की, १९ मार्च १९४० ला अस्पृश्य स्वातंत्र्य दिनाच्या १४ व्या वर्धापनदिनानिमित्त महाड येथे आयोजित कार्यक्रमात बोलताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की, नुसत्या राजकीय स्वातंत्र्याने जनतेचे कल्याण होईल, हा भ्रम आहे. याची जाणीव ठेवून त्या संदेशाच्या ८४ व्या वर्धापनदिनानिमित्त वर्तमान काळात आपण कुठे आहोत? समग्र चळवळीचे नेतृत्व, कार्यकर्ते, संस्था, संघटना, अनुयायी, हितचिंतक नेमके काय करीत आहेत? आपली त्यात भागीदारी किती? यावर विचारमंथन व्हावे म्हणून फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या विद्यमाने ३८ व्या वैचारिक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळेचे २४ मार्च २०२४ ला आयोजन करण्यात आले होते.

या कार्यशाळेचे उद्घाटन माणुसकी फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष प्रा. अनिल कांबळे यांनी केले. ते याप्रसंगी म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कुठल्या परिस्थितीत कार्य केले आहे? याची जाणीव ठेवून साडी, माडी व गाडी याच्या पलीकडे विचार करून मार्गक्रमण केले पाहिजे. शिकलेली माणसे दीड शहाणी असतात म्हणून ते इतरांना संपविण्याचा प्रयत्न करीत असतात. १९५६ च्या धर्मांतरानंतर आपण बुद्धत्व का स्विकारले नाही? आपण आपल्या आचरणातून बौद्ध असल्याचे सिद्ध केले पाहिजे. बाबासाहेब आंबेडकरांनी ३५ मातंग परिषदा घेतल्या होत्या. त्यांनी समाजासाठी सर्वव्यापी काम केले आहे. जयंतीवर लाखो रुपये खर्च होणार आहे. त्याचे फलित तपासले पाहिजे. अन्यथा भ्रमाचा भोपळा फुटल्याशिवाय राहणार नाही. करिता मानवी हक्क अधिकाराच्या अनुषंगाने बाबासाहेब स्विकारले पाहिजे.

या प्रसंगी गोविंद कांबळे म्हणाले की, चळवळ करीत असताना काही समस्या संपल्यावर काही माणसे लढायला थांबतात. गरीब श्रीमंतातील आर्थिक दरी रुंदावत चालली आहे. तसेच त्यांनी वामन दादा कर्डक यांचे 'भीमा तुझ्या मताचे जर पाच लोक असते तर, तलवारीचे तयांच्या न्यारेच टोक असते. हे गीत सादर केले. टी. एन. थोरात म्हणाले की, आपल्यातील 'मी' पणा काढून 'आम्ही' कडे वळले पाहिजे. विहारे स्फुर्ती केंद्रे व्हायला पाहिजेत. छाती ठोक हे, सांगू जगाला। असा विद्वान होणार नाही. जरी झाला विद्वान मोठा तरी बुद्ध भगवान होणार नाही. हे गीत सुद्धा त्यांनी सादर केले. एड. व्ही. डी. रामटेके म्हणाले की, सत्ता ही जनतेच्या मालकीची असावी जेणेकरून जनतेचे जीवनमान उंचावण्यासाठी प्रयत्न केले जाऊ शकतील. आपलेच लोक आपणास खाली खेचत असतात. लोक लपून छपून स्विकारतात पण उघडपणे सत्य स्विकारीत नाही. करिता बाबासाहेब १८-१८ तास अभ्यास करून मार्ग काढायचे त्यासाठी त्यासाठी कोलंबिया विद्यापीठात शिकत असताना ग्रंथालय उघडण्यापूर्वी पासून तर बंद व्हायच्या वेळेपर्यंत उपस्थित असणारे जगातील एकमेव विद्यार्थी होते. राजकारण ही एक शक्ती आहे. ज्या माध्यमातून आपल्या समस्या पटलावर मांडता येतात. पी. आर. बामणे म्हणाले की, डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी गोलमेज परिषदेत गेल्यावर रॅम्से मॅकडोनाल्ड व पंचम जॉर्ज यांचेकडून स्वतंत्र मतदारसंघ मंजूर करून घेतला होता. समाजात शहाण्या पेक्षा अति शहाणे जास्त असल्याने समाजाचे नुकसान होत आहे. महादेव डांबरे म्हणाले की, राजकीय स्वातंत्र्य हे सर्वस्व नाही पण समता निर्माण करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. २०२४ च्या निवडणुकीत सदसद्विवेकबुद्धीला स्मरून मतदान केले पाहिजे. डॉ. व्ही. एच. कांबळे म्हणाले की, चंद्रकांत हंडोरे यांनी जिल्हा जिल्ह्यात सामाजिक सभागृह बांधले. आयुक्त हर्षदीप कांबळे यांनी अनेकांना सहकार्य केले. हे उल्लेखनीय आहे. राखीव मतदारसंघातून निवडून आलेले प्रतिनिधी सुद्धा नीट कार्य करीत नाहीत. ही शोकांतिका आहे. करिता केवळ रक्ताचे नव्हे! तर वैचारिक वारसदार असावेत. शैलेंद्र मिसाळ म्हणाले की, सेवानिवृत्ती नंतर अनेक जण समाजात फिरताना



दिसतात, हे त्यांच्या वैयक्तिक स्वार्थासाठी होय. त्यांची लेकरे आंदोलनात सहभागी नसतात तर झोपडपट्टीतला माणूस पेटून उठत असतो. सत्ता येईल आणि जाईल मात्र आपण ५२ झोपडपट्टीतल्या माणसासाठी काम केले पाहिजे.

प्रमुख वक्ते ओबीसी हक्क परिषदेचे जालना जिल्हा अध्यक्ष एड. एफ. एच. शिरसाठ म्हणाले की, १९४४ ला शासनकर्ती जमात बनने, हे आमचे उद्दिष्ट आहे. असे बाबासाहेब म्हणाले होते जे १९४० च्या नुसत्या राजकीय स्वातंत्र्याने जनतेचे कल्याण होईल, हा भ्रम आहे. याच्या विसंगत वाटत असले तरी तेव्हा ते प्रासंगिक होते. आपण योग्य प्रतिनिधी विधानमंडळात पाठविले पाहिजेत. अन्यथा देशाचे संविधान धोक्यात येईल. आपल्या अज्ञानामुळे शत्रू आपल्यावर राज्य करतात. १०६ प्रतिनिधींच्या त्यागातून भारताचे संविधान निर्माण करण्यात आले आहे. तेव्हा सुद्धा जहाल आणि मवाळ असे दोन मतप्रवाह होते. राजकीय अस्पृश्यता संपली नाही म्हणून बहुजन समाजाला अजूनही प्रतिनिधीत्व नाकारले जात आहे. हे मनुवादाचे द्योतक आहे. आपले शासन आले तर शोषण होणार नाही याची दखल घेऊन भूमिका पार पाडली पाहिजे. करिता येणाऱ्या काळात फॅसिस्ट शासकांना पदच्युत करून भारताचे संविधान रक्षणकर्त्यांना सहकार्य करावे जेणेकरून बुद्धमय भारतात आंबेडकरवाद स्थापित होईल.कार्यशाळेचा अध्यक्षीय समारोप करताना फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे संचालक बी. बी. मेश्राम म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १९ मार्च १९२७ ला महाडच्या सत्याग्रहातील सभेत अखिल भारतीय अस्पृश्य समाजाच्या वतीने स्वातंत्र्य, समता आणि बंधूता या तत्वत्रयींची जाहीर घोषणा केली होती. सभेनंतर हजारो अस्पृश्यांनी मिरवणुकीने चवदार तळ्यावर जाऊन सार्वजनिक पाणवठ्यांवर पाणी भरण्याचा आपला नागरिक स्वातंत्र्याचा आणि समानतेचा हक्क प्रस्थापित केला म्हणून या दिवशी अस्पृश्य जनतेने स्वातंत्र्य दिन साजरा केला पाहिजे, असे बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते. त्या अनुषंगाने १४ व्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमाचे जाहीर सभा, मिरवणूक, झेंडा वंदन, स्वातंत्र्य प्रतिज्ञा असे एकंदरीत स्वरूप होते. लाल रंगाच्या झेंड्यावर मधोमध 'स्वतंत्र मजूर पक्ष' लिहिले होते तर डाव्या बाजूस वरच्या कोपऱ्यात ११ तारे दाखविले होते जे ११ प्रांताचे द्योतक होते. यावरून बाबासाहेबांची चळवळ ही राष्ट्रव्यापी होती, हे सिद्ध होते. त्यात आम्ही माणूसकीचे हक्क मिळविणारच अशी प्रतिज्ञा करण्यात आली होती. काँग्रेसचे हरिजन प्रेम हे बेठबिगारी कायम ठेवण्यासाठी असल्याचे जाणीव करून देण्यात आली होती. ज्यामुळे आपली शारिरीक, आर्थिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक व अध्यात्मिक पिळवणूक होत होती. म्हणून अस्पृश्यांना राजकीय सत्तेचा वाटा मिळवून देऊन मानवी हक्क स्थापित करण्याची प्रतिज्ञा करण्यात आली. महाड सत्याग्रहाचा खटला २७ मार्च १९२७ पासून महाड कोर्टातून ठाणे कोर्टात अपील करण्यात आले पुढे मुंबई हायकोर्टात अपील केले. ज्याचा न्यायमूर्ती ब्रमफील्ड यांनी चवदार तळे हे डि. म्यू. कायद्याप्रमाणे महाड नगरपालिकेची मालकी असल्याचा निर्णय दिला. ज्यातून संघटना व शिस्तीच्या बळावर अवघड कार्य यशस्वी करता येते हे सिद्ध झाले. या खटल्याच्या यशस्वीतेसाठी मि. गुप्ते व मि. मोडक यांनी महान कामगिरी पार पाडली होती. ज्यातून स्वतंत्र मजूर पक्षाचा जन्म झाला होता. जी त्या आंदोलनाची फलश्रृती होती. परिणामी महार व ब्राह्मण यांनाच राजकारण कळते, असे म्हणण्याची वेळ आली होती. कुणबी मराठ्यात मात्र तेव्हा ही जागृती नव्हती आणि आजही ती परिस्थिती हव्या त्या प्रमाणात बदललेली नाही याला जबाबदार कोण? याचा शोध घेण्याची नितांत आवश्यकता आहे. वर्तमान काळात शत्रू मित्राची ओळख करून घेतांना आंदोलनाची वाट लावणारे आणि आंदोलनाला वाट दावणारे कोण आहेत? याची जाणीव ठेवून मार्गक्रमण करणे आवश्यक आहे. ज्यासाठी नव्याने राजकारणात प्रवेश करणा-यांसाठी पॉलिटिकल स्कूल चालविले पाहिजे. अन्यथा भीम के लगते जिगर, मगर आधे इधर और आधे उधर ही परिस्थिती बदलणार नाही. शेवटी लोक म्हणतात की, सत्तेपुढे शहाणपण चालत नाही. हे जर खरं असेल तर, मग लोक शहाण्या लोकांची सत्ता का आणत नाहीत? भिंती पलीकडील वर्तमान पत्रातील मजकूर वाचताना दोन ओळीतील आणि दोन ओळी मागील अर्थ समजून घेण्याची क्षमता विकसित झाली पाहिजे. करिता राजकीय पक्षाने केवळ मात्र निवडणूक जिंकल्याने त्यांचे अस्तित्व अबाधित राहिल असे नव्हे! तर त्यांनी जनतेला शिक्षित करून संघर्षासाठी तयार करताना संघटीत केले पाहिजे, असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी २४ सप्टेंबर १९४४ ला मद्रास येथे प्रतिपादन केले होते. हे जर आपण करू शकलो नाही तर नुसत्या राजकीय स्वातंत्र्याने जनतेचे कल्याण होईल, हा भ्रम आहे. हे सिद्ध होईल.

या कार्यशाळेला रूपचंद पवार, प्रा. अनिल कांबळे, कुणाल कदम, डॉ. व्ही. एच कांबळे, पी. आर. बामणे, महादेव डांबरे, गोविंद कांबळे, बी. बी. मुजमुले, साधू आनंद, एड. विलास रामटेके, टी. एन. थोरात, शैलेंद्र मिसाळ, डॉ. आर. डी. बडगे, एड. एफ. एच. शिरसाठ, बी. बी. मेश्राम इत्यादी प्रतिनिधी उपस्थित होते. अशाप्रकारे आभार प्रदर्शनाने हर्षोल्हासात कार्यशाळेची सांगता झाली.

### भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर ..

साजरा करण्याऱ्या नूतन मंडळांचा समाविष्ट मध्यवर्ती मध्ये करून घ्यावा असे सालाबाद प्रमाणे निवेदन दिले. तसेच सोलापूर महापालिकेला निवेदनातून सांगण्यात आले की,मिरवणुकीच्या मार्गावरील सर्व रस्ते,लाईट,पाण्याची सोय व मिरवणूक मार्गा मध्ये येणाऱ्या झाडांची छाटणी करून सर्व अडथळे काढून घ्यावेत,तसेच जयंती निमित्त होणाऱ्या सप्ताह मध्ये महापालिकेच्या अनुषंगाने येणारे सर्व योग्य ते आदेश काढावेत आणि मिरवणुकीच्या दिवशी अँब्युलन्स, फायर ब्रिगेड या सारख्या अत्यावश्यक गोष्टींची सोय करावी असे निवेदन देण्यात आले.

यावेळी राजाभाऊ सरवदे,राजाभाऊ इंगळे,सुभानजी बनसोडे,संजीव सदाफुले,प्रवीण निकाळजे,अतुल नागटिळक,अरुण भालेराव,शशिकांत कांबळे,विश्र्वास तळभंडारे,अजित गायकवाड,सुशील सरवदे,सुग्रीव जेटीथोर,बबलू गायकवाड,राहुल शंके,शिवम सोनकांबळे,विजय सोनवणे,अनिकेत आबुटे

जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष नागेश रणखांबे,सचिव प्रा.संघमित्रा चौधरी,कार्याध्यक्ष व्यंकटेश भंडारे,खजिनदार अमोल धेंडे,ऑडिटर अनिल सोनकांबळे व मध्यवर्ती चे विश्र्वस्त,उत्सव समितीचे पदाधिकारी उपस्थित होते.

### छाननी नंतर नांदेड लोकसभा मतदार..

(समनक जनता पार्टी), हरी पिराजी बोयाळे (बहुजन भारत पार्टी) यांचा समावेश आहे.

तर अपक्षांमध्ये अकबर अख्तर खॉन, अक्रम रहेमान सय्यद, अनवर अ. कादर अहमद कादर शेख, अमजत खॉ सखर खॉन, अरुण भागाजी साबळे, अश्फाक अहमद, असलम इब्राहिम शेख, शेख इमरान शेख पाशा, इरफान फारूक सईद, मोहम्मद इलियाज अब्दुल वहिद मोहम्मद, कदम सुरज देवेंद्र, कल्पना संजय गायकवाड, खान अलायार युसुफ खान, अहमद खालिद अहमद रफीक, गजानन दत्तारामजी धुमाळ, जगदीश लक्ष्मण पोतरे, जफर अली खाँ मेहमूद अली खाँ पठाण, जुल्फेखान जिलानी सय्यद, तबस्सुम बेगम, तुकाराम गणपत बिराजदार, थोरात रवींद्र गणपतराव, देविदास गोविंदराव इंगळे, नय्यर जहाँ मोहम्मद फेरोज हुसेन, नागेश संभाजी गायकवाड, नागोराव दिगंबर वाघमारे, निखिल लक्ष्मणराव गर्जे, प्रमोद किसनराव कामठेकर, फहाद सलीम शेख सलीम शेख, भास्कर चंपतराव डोईफोडे, मजिद अ अकबर, मोहम्मद तौफिक मोहम्मद युसुफ, मोहम्मद मुबीन शेख पाशा, मोहम्मद सलीम मोहम्मद इकबाल, महारुद्र केशव पोपळाईतकर, ॲड. मारोतराव कान्होबाराव हुक्के पाटील, मोहम्मद नदीम मोहम्मद इक्बाल, मोहम्मद वसीम, मोहम्मद सिद्दीकी शेख संदलजी, युनिस खान, युनिस खाँ युसुफ खाँ, रमेश दौलती माने, राठोड सुरेश गोपीनाथ, लतीफ उल जाफर कुरेशी, लक्ष्मण नागोराव पाटील, ॲड. विजयसिंह चौव्हाण, विनयमाला गजानन गायकवाड, वैशाली मारोतराव हुके पाटील, शिवाजी दत्तात्रय गायकवाड,साहेबराव नागोराव गुंडीले, साहेबराव भिवा गजभारे,ज्ञानेश्र्वर बाबुराव कोंडामंगले ज्ञानेश्र्वर रावसाहेब कपाटे, शाहरुख खमर, मोहनराव आनंदराव वाघमारे यांचा समावेश आहे.

**शनिवारीही अर्ज परत घेता येईल** लोकसभा निवडणुकीसाठी अर्ज परत घेण्याची मुदत ८ एप्रिल आहे. मात्र उद्या शनिवार दिनांक ६ एप्रिल रोजी सकाळी ९.४५ ते सायंकाळी ६.१५ वाजेपर्यंत नामनिर्देशनपत्र परत घेता येणार आहेत. सोमवारी सकाळी ९.४५ ते दुपारी ३ वाजेपर्यंत अर्ज परत घेता येणार आहेत. रविवारी मात्र सुट्टीचा दिवस आहे. त्यामुळे पुढील दोन दिवसात उमेदवारांना आपले नामनिर्देशनपत्र परत घेता येणार असल्याची माहिती सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी विकास माने यांनी दिली आहे.

### ३० लाख युवकांना नोकरी,

गेम चेंजर म्हणून आणण्याची शक्यता * शैक्षणिक कर्जावरील व्याजदरात सवलत * लाखो रिक्त पदे भरण्याचे केंद्राचे आश्वासन. * अग्निवीर योजना बंद करून जुनी भरती योजना सुरू करण्याचे आश्वासन दिले जाणार * पेपरफुटी थांबवण्यासाठी कठोर शिक्षा आणि जगात यशस्वी मानले जाणारे तंत्र आणि रणनीती वापरण्याचे वचन. * गृहलक्ष्मीसारख्या योजनेपेक्षा अधिक पैसे थेट महिलांच्या खात्यात जमा करण्याचे आश्वासन. * ४५० रुपयांना गॅस सिलिंडर देण्याचे आश्वासन दिले. * बस प्रवासात सवलत देण्याचे आश्वासन. * शेतकऱ्यांना थेट कर्जमाफीऐवजी एमएसपी हमी देण्याचे आश्वासन. * शेतकऱ्यांच्या उपकरणांवरून जीएसटी काढण्याचे किंवा कमी करण्याचे आश्वासन.* महागाईपासून सुटका करण्यासाठी पावले उचलणार * पेट्रोल आणि डिझेलचे दर कमी करण्याचे आश्र्वासन दिले.* जात जनगणना आणि त्यांच्या संख्येवर आधारित आरक्षणाचे आश्वासन.* आरक्षणावरील ५० टक्के मर्यादा हटवण्यात येणार आहे. * न्याय योजनेच्या धर्तीवर (गरीब कुटुंबांना प्रतिवर्षी ७२ हजार रुपये), गरीब मजुरांसाठी आणखी मोठी आकर्षक योजना आणण्याचे वचन.* पुरेसा अंदाजपत्रक देऊन मनरेगाची पुन्हा योग्य प्रकारे अंमलबजावणी करण्याचे आश्र्वासन * रेल्वे भाडे कमी करण्याचे आश्र्वासन, वृद्धांना सवलत काढून घेणे, डायनॅमिक फेअर सारख्या योजना बंद करणे. *रेल्वेचे खाजगीकरण होऊ देणार नाही असे आश्र्वासन.* लघुउद्योगांना चालना देण्यासाठी त्यांचे कर्ज काही प्रमाणात माफ करून त्यांना परवडणाऱ्या दरात कर्ज देण्याचे आश्वासन. * देशभरात आठ कोटी हमी कार्ड वितरित करण्यासाठी ३ एप्रिलपासून घरोघरी जावून हमी अभियान सुरू केले, राहुल गांधी यांनी वायनाड येथून मोहिमेची सुरुवात केली.* जाहीरनामा हिंदी,जी तसेच प्रादेशिक भाषांमध्ये प्रसिद्ध केला जाईल आणि डिजिटल स्वरूपात उपलब्ध असेल.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# अचलेरचे ग्रामदैवत श्री मल्लिकार्जुन देवाच्या यात्रेला सोमवार पासुन उत्साहात प्रारंभ

## श्री शंभु महादेवाची ऐतिहासीक कावड यात्रेतील मुख्य आकर्षण

सोलापूर/महेश गायकवाड लोहारा तालुक्यांतील अचलेर गावचे ग्रामदैवत श्री मल्लिकार्जुन देवाच्या यात्रेला सोमवार दिनांक ८ एप्रिल २०२४ पासुन प्रारंभ होत असुन ही यात्रा पाच दिवस चालणार आहे, या यात्रेचे मुख्य आकर्षण असलेली श्री शंभु महादेवाची ऐतिहासीक कावड भव्य भगव्या ध्वजासह आणि मोठ्या जलकुंभासह भिमनगर येथील कावडी चे मुख्य विश्र्वस्त आणि मुख्य मानकरी कै. शंकर साधू गायकवाड यांच्या घरातून परंपरागत पद्धतीने निघणार आहे. श्री शंभू महादेवाची ही कावड सद्याचे मानकरी महादेव शंकर गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली मुख्य विश्र्वस्त शंकर साधू गायकवाड यांचे नातवंडे मल्लिनाथ सहदेव गायकवाड, शंकर महेश गायकवाड, सुयश महेश गायकवाड, प्रतिक बसवेश्र्वर गायकवाड, चेतन बसवेश्र्वर गायकवाड, विवेक परमेश्र्वर गायकवाड, सिध्दार्थ ब्रम्हू गायकवाड अमोल ब्रम्ह गायकवाड, नाती कोमल गायकवाड सविता गायकवाड सुजाता धोडमनी तसेच निकिता विष्णु गायकवाड, उमा महादेव गायकवाड, आणि विषाखा परमेश्र्वर गायकवाड



व नात सुना आरती शंकर गायकवाड, पणतू सतेज शंकर गायकवाड, राहुल चंद्रकांत धोडमनी, रोशनी चंद्रकांत धोडमनी या सर्वांनी मिळुन परंपरागत पद्धतीने कावड वाजत गाजत यात्रेत सहभागी करत असतात. निलगंगेच्या डोंगर रांगेत असलेले आणि प्रति श्रीशैल मल्लिकार्जून समजले जाणारे श्री मल्लिकार्जुन देवाचे मंदिर हे हेमाडपंथी बांधणीचे असून मंदिराचा कळस व शिखर हे अतिशय उंच असे आहे, तर मंदिरतील श्री महादेवाची पिंड ही दक्षिणा भिमुख आहे. यात्रेसाठी मंदिरातून देवाला सोमवार दिनांक ८ एप्रिल २४ रोजी रात्री गावातील विरक्त मठात आणले जाणार आहे. मंगळवार दिनांक ९ एप्रिल २४ गुडी पाडवाचा दिवस हा यात्रेचा मुख्य दिवस असुन गुडी पाडव्याच्या या मुहूर्तावर पहाटे ग्रामस्थांचे अभिषेक आणि दंडवत हे कार्यक्रम पार पडणार आहेत, या नंतर दुपारी ठीक ४ वाजता भिम नगर येथुन श्री शंकर साधू गायकवाड यांचे उत्तराधिकरी आणि श्री शंभु महादेव कावडीचे मानकरी महादेव शंकर गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली हलगी तुतारी बेंडबाजा ढोल ताशा व इतर प्रारंपारिक विविध वाद्यांच्या गजरात कावड यात्रेत सहभागी होण्यासाठी गावातील विरक्त मठाकडे जाईल, यांनतर विरक्त मठातून श्री मल्लिकार्जुन देवाची पालखी आणि श्री महादेवाची कावड तसेच मानाचे सर्व नंदिकोल यांची भव्य शोभा यात्रा निलगंगेच्या डोंगर रांगेत असलेल्या श्री मल्लिकार्जुन मंदिराकडे निघणार आहे. या यात्रेतील मुख्य आकर्षण असलेली श्री शंभू महादेवाची ऐतिहासीक कावड ही भव्य भगव्या ध्वजासह आणि जलकुंभासह श्री शंभु महादेवाचा धावा करत जेव्हा पळत निघते, तेव्हा सर्वांचे लक्ष वेधून घेते, हे या यात्रेतील मुख्य आकर्षण आहे. श्री शंभू महादेवाची ऐतिहासीक कावड आणि श्री मल्लिकार्जुन देवाची पालखी हे मंदिरत जात असताना भाविकांकडून कावडी वर आणि पालखी वर गुळ,खोबरे, खडी,साखर यांची मुक्त पणे उधळण केली जाते, श्री मल्लिकार्जुन मंदिरात पालखी तसेच कावड आणि नंदिकोल हे विसावल्यावर सर्व देवी देवतांची पुजा अर्चा केली जाते, व श्री बसवेश्र्वर मंदिरात पुजा करुन मंदिराला प्रदक्षिणा घालून मंदीर परिसरात असेलल्या मुख्य दीपमाळा पेटविल्या जातात, यानंतर गोडे तेलाच्या असंख्य मशाली आणि श्री शंभू महादेव कावडी ची मोठी मशाल यांच्या उजेडात देवाला पालखी मध्ये विराजमान करण्यात येते, आणि पुन्हा सर्वात पुढे कावड यांनतर नंदिकोल मग पालखी असे हे सर्व विविध वाद्यांच्या गजरात आणि वाजत गाजत आणि फुलबाजे व दारू चे औट गोळे उडवत आणि नाचत गाजत गावातीलच मठाकडे घेवून येतात, बुधवार दिनांक १० एप्रिल २४ रोजी सायंकाळी सहा वाजता श्री अंबाबाई मंदिरा जवळ भव्य असा शोभेचे दारूकाम सोहळा पार पडणार आहे. यांनतर ११ एप्रिल २४ रोजी नामवंत मल्लांच्या जंगी कुस्त्यांचा फड श्री मल्लिकार्जुन मंदिर परिसरात रंगणार आहे. या वेळी आलेल्या सर्व भक्तांसाठी खिरीचा प्रसाद वाटप केला जाणार आहे. दिनांक १२ एप्रिल २४ रोजी देव बोळवण्याच्या कार्यक्रमाने पाच दिवस चालेल्या या यात्रेची सांगता होणार आहे. या यात्रेत दररोज करमणुकीचे सांस्कृतीक कार्यक्रम आयोजीत करण्यात आले आहेत. सोमवारी आशाताई राऊत लातूर यांचे भव्य कीर्तन रात्री ९ वाजता होणार आहे. मंगळवारी पाडवा दिवशी रात्री ९ वाजता मनोधैर्य नाट्य मंडळ आयोजितत सामाजिक तिन अंकी नाटक रक्तात भिजली नाती हा प्रयोग सादर केला जाणार आहे.


बुधवारी सकाळी १० वाजता भव्य भारुडाचा कार्यक्रम होणार आहे. गुरुवार रोजी शकुंतला नाईक (गुलबर्गा) व भिमशा कडदाळे (रायबाग) यांचे डफावरचे कन्नड गाणे होणार आहेत सतत तिन दिवस सामजिक नाटक सादर केले जाणार आहे ही यात्रा मोठया उत्साहात आणि आनंदी वातावरणात साजरी करण्यासाठी यात्रा कमिटी प्रयत्नशील असून सर्वांनी यात्रेत मोठ्या प्रमाणात सहभागी होऊन यात्रा उत्साहात आणि आनंदात व शांततेने साजरी करावी असे आवाहन श्री मल्लिकार्जुन देवस्थान यात्रा कमिटीने केले आहे.

### गावांतील बेकायदेशीर अवैध धंदे व हातभट्टी दारू बंद करण्याची मागणी ग्रामस्थानी केली आहे.

गावचे ग्राम दैवताची यात्रा असल्यामुळे ही यात्रा मोठया उत्साहात आणि आनंदात साजरी केली जाते, या यात्रेत सहभागी होण्यासाठी अचलेर पंचक्रोशीतील आणि बाहेर गावी कामा धंद्यासाठी गेलेले सर्व जण गावांत आलेले असतात, दूरवरचे भक्त मंडळीही यात्रेत सहभागी होण्यासाठी येतात, त्यामुळे गावची यात्रा उत्साही वातावरणात आणि शांततेत पार पाडण्यासाठी गावातील सर्व अवैध धंदे, हातभट्टी दारू चे अड्डे यात्रा काळात बंद करण्यात यावेत, शी मागणी ग्रामस्थानी केले आहेत.

# स्वराज्य कारखाना सोलापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना सर्वात जास्त दर देणारा पहिला कारखाना

पंढरपूर/प्रतिनिधीः फलटण तालुक्यातील स्वराज्य सहकारी साखर कारखान्याच्या वतीने सोलापूर जिल्ह्यातील माळशिरस करमाळा या भागातील शेतकऱ्यांसाठी ऊसाला जातो शेतकरी केंद्रबिंदू म्हणून खासदार रणजीत सिंह नाईक निंबाळकर यांच्या मार्गदर्शनाखाली या कारखान्याची वाटचाल सुरू आहे यापूर्वी दुष्काळी परिस्थिती असताना सुद्धा कारखान्याने चार लाख ८२ हजार गावात केले आहे या भागातील सर्वात जास्त म्हणजे ३१०१/दर देणारा साखर कारखाना म्हणून या कारखान्याची नोंद झाली आहे अशी माहिती अँड जिजामाता नाईक निंबाळकर यांनी दिली फलटण भागातील गाव दौरे सुरू आहेत यावेळी शेतकऱ्यांच्या



माहिती देताना अँड जिजामाता नाईक निंबाळकर बोलत होत्या पुढे बोलताना म्हणाल्या की म्हणाले की खासदार रणजीत सिंह नाईक निंबाळकर यांनी तालुक्याच्या विकासासाठी अनेक प्रकल्प मार्गी लावले आहेत मेरा देवधर या प्रकल्पातून सांगोला माळशिरस फलटण या परिसरातील शेती पाण्याचा प्रश्न मार्गी लावण्यात लावला आहे त्यामुळे सर्व आम्ही शेतकऱ्यांना खूप मोठ्या प्रमाणात याचा फायदा होणार आहे असून शेती हा पाण्याखाली येणार आहे भविष्यात उसाचे पीक मोठ्या प्रमाणात होणार आहे यामुळे शेतकरी शेतमजूर व युवक यांना हाताने काम मिळणार आहे याचे कारण तालुक्याचे अर्थकारण मजबूत होणार आहे याचा फायदा तालुक्यातील सर्व शेतकरी शेतमजूर व युवकांना होणार आहे असे मत अँड जिजामाता निंबाळकर यांनी सांगितले

# कु.गणेश संतोष सुतार याचा समृद्धी २०२४ परीक्षेमध्ये राज्यात तृतीय क्रमांक



**पत्रकार नामदेव निर्मळे** टाकळीवाडी तालुका शिरोळ येथील जिल्हा परिषद शाळा कुमार विद्यामंदिर या शाळेचा विद्यार्थी गणेश सुतार इयत्ता दुसरी नुकत्याच झालेल्या समृद्धी परीक्षा २०२४ मध्ये १०० पैकी ९६ गुण मिळवून राज्यात तृतीय क्रमांक व जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावला. जिल्हा परिषद शाळा कुमार विद्यामंदिर या शाळेचे विद्यार्थी कुठेही कमी नाही. असे अनेक विद्यार्थी यापूर्वी सुद्धा दाखवून दिलेले आहे. निकालाची परंपरा जपत विद्यार्थी शाळेचे व गावचे नाव लौकिक करत आहेत. चांगला शिक्षक वर्ग, चांगली गुणवत्ता, शाळेतील अनेक सुख, सुविधा, असल्यामुळे शाळा नावलवकिक झालेली आहे. गावामध्ये विद्यार्थ्यांचे कौतुक होत आहे. शाळेचे मुख्याध्यापक, सर्व शिक्षक, शिक्षिका, यांचे मोलाचे योगदान लाभले.

# विरोधकांनी वेगवेगळे मुद्दे घेऊन फक्त लोकांना भुलविण्याचे काम केले : भास्कर भगरे

## दिंडोरी लोकसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे उमेदवार भगरे यांचे निफाड नगरीत जल्लोषात स्वागत

निफाड : कांद्याची निर्यात बंदी करून कांदा उत्पादक शेतकऱ्यांचे मोठे नुकसान केले असून याचा फटका द्राक्ष शेतीलाही बसला आहे टोमॅटोची तीच अवस्था असून शेतकऱ्यांच्या शेतीमालाला कुठल्याही प्रकारचा बाजारभाव नसल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे बेरोजगारी वाढत आहे विरोधक फक्त वेगवेगळे मुद्दे घेऊन लोकांना निवडणुकीच्या काळात भुलविण्याचे काम करते असे उदगार दिंडोरी लोकसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे उमेदवार भास्कर भगरे यांनी निफाड येथे आले असता मतदारांच्या भेटी गाठी प्रसंगी काढले



दिंडोरी लोकसभा मतदार संघाचे महाविकास आघाडी, इंडिया आघाडीचे अधिकृत उमेदवार भास्कर मुरलीधर भगरे हे उमेदवारी जाहीर झाल्यानंतर पहिल्यांदाच निफाड नगरीत आले ,या वेळी त्यांचे हस्ते छत्रपती शिवाजी महाराज व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला, या वेळी उपस्थित कार्यकर्त्यांनी फटाक्याच्या आतीशबाजीत भगरे यांचे जल्लोषात स्वागत केले, कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत शहरातून फेरी मारुन मतदारांच्या भेटीगाठी घेण्यात आल्या, या प्रसंगी भगरे म्हणाले सध्या शेतकरी वर्ग मोठ्या संकटांचा सामना करत आहे.तर काही भागात पाऊस कमी झाला असल्याने लोकांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर झाला आहे.त्या बाबद कुठल्याही प्रकारचे नियोजन केले जात नाही, अन्नधान्य वाटप असेल ,साडी वाटप असेल, शासन आपल्या दारी, असे म्हणायचे परंतु खऱ्या अर्थाने लोकांना सुखी करण्यासाठी ज्या गोष्टी करायला पाहिजे त्या गोष्टी मात्र केल्या जात नाही ,आज बेरोजगारीचे प्रमाण वाढले आहे, विरोधक वेगवेगळे मुद्दे घेऊन लोकांना फक्त भुलविण्याचे काम करत आहेत,मी लोकांमध्ये जातो त्यावेळी लोकांच्या अगदी तीव्र प्रतिक्रिया असून ही निवडणूक आता सर्वसामान्य जनतेने हातात घेतली आहे जनता मला नक्कीच भरघोस मतांनी निवडून देईल असा विश्र्वास भगरे यांनी व्यक्त केला, याप्रसंगी बापूसाहेब कुंदे आदींनी आपले मनोगत व्यक्त केले व निफाड करांच्या वतीने त्यांना पाठिंबा दर्शविला. याप्रसंगी विक्रम रंधवे, संजय कुंदे, इरफान सय्यद , साहेबराव कापसे .रावसाहेब कुंदे,जावेद शेख ,संजय धारराव, गणेश कापसे, विजय धारराव ,मोहन जाधव, गोकुळ जाधव, राहुल नागरे,रतन गाजरे ,सुहास सुरळीकर, समाधान कुंभार्डे, बंटी शिंदे ,सचिन खडताळे ,भीमराज साळुंखे, बापू कापसे ,दीपक भापकर ,सदाशिव कुंदे ,स्वप्नील बिनायके ,संजय सानप, रमेश जाधव ,दौलत कापसे ,माणिक गायकवाड, विलास कुंदे, योगेश कुंदे, जेष्ठ नागरिक व आदी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते,

# सोलापूरकरांच्या उदंड प्रतिसाद: नागरिकांनी दिली आपकी बार ४०० पारची घोषणा

## विकास की बात मॉर्निंग के साथ:आ. राम सातपुते

पंढरपूर/प्रतिनिधीः पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली सोलापूरच्या महाराष्ट्र आणि देशभरात झालेल्या विकासावर चर्चा करीत भाजप आणि माहितीचे उमेदवार आमदार राम सातपुते यांनी शुक्रवारी विकास के बाद मॉर्निंग के साथ या संवाद कार्यक्रमादरम्यान नागरिकांच्या भेटी घेतल्या ग्रामदैवत श्री सिद्धेश्र्वर मंदिराच्या भोवती असलेल्या तलावाच्या वॉकिंग ट्रॅक वर हा कार्यक्रम झाला. त्यावेळी सकाळी फिरायला आलेल्या सोलापूरकरांची आमदार राम सातपुते यांनी संवाद साधत चर्चा केली तसेच सोलापूरकरांच्या विकासाच्या विविध मुद्द्यावर चर्चा केली व नागरिकांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कामाची भरभरून प्रशंसा करत संपूर्ण सोलापूरकर मोठ्या ताकतीने भाजप व माहितीच्या पाठीशी असल्याने ठामपणे सांगितले यावेळी अनेक तरुण महिला भगिनी ज्येष्ठ नागरिक यांच्याशी संवाद साधत आमदार राम सातपुते यांनी सोलापूरकरांच्या विकासाची हमी दिलीयावेळी आमदार राम सातपुते म्हणाले सोलापूरच्या आयटी पार्क आणि सोलापूरकरांना दररोज पाणी देणे युवकांच्या सोलापूर सोलापुरातच नोकऱ्या मिळवून देणे गारमेंट पार्क वर्ल्ड सेंटर एमआयडीसीतील सुविधा व्यापाऱ्यांसाठी सुविधा देणे असे आमच्या अजेंडा वरील विषय आहे तो आगामी काळात ते पूर्ण करण्यात प्राधान्य राहणार आहे असे अभिवचनी आमदार राम सातपुते यांनी याप्रसंगी दिली या प्रसंगी आमदार राम सातपुते यांनी खंडक बागेत नागरिक बॅडमिंटन खेळण्याचा ही आनंद लुटला विरोधक भाजपवर आणि परंपरा नरेंद्र मोदी टीका करत आहेत याबाबत आमदार रामसभेचे म्हणाले की तुम्ही माझ्यावर टीका करा आम्ही भाजपने केलेली पाच कामे सांगू तुम्ही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर टीका करा आम्ही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेली २५ विकास कामे तुम्ही भाजपवर टीका करा आम्ही भाजपने केलेले हजारो विकास कामे सांगू कोणी



कितीही टीका केली तरी भाजप विकास कामाच्या मार्गावरून हातणार नाही, ग्रामदैवत श्री सिद्धेश्र्वर मंदिरात शेजारील वॉकिंग ट्रॅक देखील पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील भाजप सरकारनेच बनवला आहे असे आमदार राहतात होते सांगायला विसरले नाहीत असे ते म्हणाले

# टेंभुर्णी येथील काळभैरवनाथ मंदिरात १५१२ होमकुंडात होमहवनाचे आयोजन

टेंभुर्णी/प्रतिनिधी : कोणत्याही अडचणीतून संकटातून भक्तांना सोडविणारा, भक्ताच्या हाकेला ओ देणारा, धावत येणारा चांगल्या कामासाठी शक्ती देणारा, दृष्ट वाईट शक्तीचा संहार करणारा, नवसाला पावणारा, शिवशंकराचा रुद्रावतार असणारा, व्यर्थ जीवनाला सोनेरी बनवणारा असे भवानीनगर, टेंभुर्णी, ता.माढा येथील जागृत देवस्थान काळभैरवनाथाच्या मंदिरात १५१२ होमकुंड होम हवन करण्याची सुवर्णसंधी सर्वांना मोफत संधी आहे. तरी याचा लाभ टेंभुर्णीकरांनी घ्यावा असे आवाहन भैरवनाथ देवस्थान ट्रस्टच्या वतीने करण्यात आले आहे.

शुक्रवार दिनांक ३ मे २०२४ रोजी सायंकाळी ५.०४ वा ते ७.०२ वा या वेळेत होणार आहे. यासाठी २४ मार्च २०२४ ते २३ एप्रिल २०२४ या कालावधीमध्ये मंदिराच्या दोन्हीही खिडकीमध्ये दोन रजिस्टर ठेवले आहेत. त्यामध्ये नोंद करावी. जे पहिले १५१२ नोंदणी होतील, त्यांनाच फक्त प्राधान्य मिळेल.

या होमासाठी एक व्यक्ती, एक जोडी, एक परिवार बसू शकतात. हा कार्यक्रम विनामूल्य असेल याची नोंद घ्यावी. शनिवार दिनांक ४ मे २०२४ रोजी दुपारी दोन वाजून सात मिनिटे ते सायंकाळी सात वाजून वीस मिनिटे या कालावधीमध्ये श्री काळभैरवनाथ रथोत्सव आणि रविवार दिनांक ५ मे २०२४ रोजी सकाळी ९ वा ते रात्री ९ वा महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

श्री काळभैरवनाथ मंदिराला १४ वर्षे पूर्ण व श्री काळभैरवनाथ रथोउत्सवाला १२ वर्षे पूर्ण झाली आहेत.

त्यानिमित्त ऐतिहासिक टेंभुर्णी नगरीमध्ये अत्यंत जागूरुक असणाऱ्या काळभैरवनाथकडून सर्वांना होमहवन करण्याची संधी देण्यात आली आहे.

# राष्ट्रीय सेवा योजनेच्या उपक्रमांतून आत्मविश्वास वाढतो : रासेयोचे संचालक डॉ.राजेंद्र वडजे

पंढरपूर/प्रतिनिधीः 'आपत्तीत बळी पडलेल्या माणसाला सर्व प्रथम धीर देवून त्याची मानसिकता सांभाळण्याची गरज असते यासाठी अत्यंत सकारात्मकतेची भाषा वापरावी लागते. या अशा कार्यशाळेमधूनच भविष्यात भक्कम नेतृत्व तयार होत असते. म्हणून राष्ट्रनिर्मितीसाठी 'राष्ट्रीय सेवा योजना' ही अतिशय महत्वाची भूमिका बजावते. या उपक्रमातून विद्यार्थ्यांचा आत्मविश्र्वास वाढतो आणि त्यांच्या वागणुकीत धाडसीपणा येतो.' असे प्रतिपादन पुण्यश्र्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूरचे राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. राजेंद्र वडजे यांनी केले. पुण्यश्र्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर व रासेयो विभाग, स्वेरीज कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, पंढरपूर यांच्या संयुक्त विद्यमाने गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील श्री. विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटयूट संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगमध्ये 'आपत्ती व्यवस्थापन व नेतृत्व विकास' या विषयावर दि.२१ मार्च ते दि. २३ मार्च २०२४ या दरम्यान कार्यशाळेचे आयोजन केले होते. याच्या समारोप प्रसंगी पुण्यश्र्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूरचे राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. राजेंद्र वडजे हे मार्गदर्शन करत होते. स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.बी. पी. रोंगे यांच्या नियोजनबद्ध मार्गदर्शनाखाली स्वेरीच्या कॅम्पसमध्ये तीन दिवस ही 'आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळा' पार पडली. या तीन दिवसात विद्यार्थ्यांना आपत्ती व्यवस्थापनाबाबत महत्वपूर्ण माहिती मिळाली. यामध्ये जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शक्तिसागर ढोले यांनी आपत्ती व्यवस्थापन, आपत्ती व्यवस्थापन सहाय्यक अधिकारी अर्चना बिसोई यांनी नैसर्गिक व मानव निर्मित आपत्तीचे विविध प्रकार, पंढरपूर नगर परिषदेच्या अग्निशामक दलाचे अधिकारी संभाजी कार्ले यांनी आगीचे प्रकार, आग कशी विझवावी, आग आटोक्यात आणण्यासाठी नेमके काय करावे व आगीपासून संरक्षण कसे करायचे यावर महत्वाची माहिती दिली. परशुराम कोरे यांनी आपत्तीमध्ये जखमी माणसाला तात्काळ दवाखान्यात कसे पोचवायचे, यासाठी संबंधितांना कसा संपर्क साधायचा, यावेळी 'प्रथमोपचार कसे करावे' याचे प्रात्यक्षिक करून सविस्तर माहिती दिली. राष्ट्रीय सेवा योजनाचे पंढरपूर विभागीय समन्वयक डॉ.संजय मुजमुले यांनी 'व्यक्तिमत्व विकास' या विषयावर तर स्वेरीच्या रासेयोचे सल्लागार डॉ.आर.एन.हरिदास यांनी 'नेतृत्व व विकास' या विषयावर बहुमोल मार्गदर्शन केले. पुढे बोलताना संचालक डॉ. वडजे म्हणाले की, 'शैक्षणिक उपक्रम असो अथवा कोणताही सामाजिक कार्यक्रम असो स्वेरीमध्ये डॉ. रोंगे सरांच्या नेतृत्वाखाली अत्यंत नियोजनपूर्ण, शिस्तबद्ध आणि बहारदार होत असताना कुठेही उणीव भासत नाही हे आता सर्वश्रुत आहे. उत्तम नियोजन असल्यामुळे 'आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळा' स्वेरीमध्ये घेण्याचे ठरवले. स्वेरीने यासाठी त्वरित हिरवा कंदील दाखवला. या कार्यशाळेत मागील तीन दिवसांमध्ये स्वेरीने अपेक्षेप्रमाणे उत्तम नियोजन तर





केलेच पण कार्यक्रम कसे आयोजित केले पाहिजेत याचा आदर्श घालून दिला. या अशा उत्तम नियोजनामुळे स्वेरीमध्ये प्रत्येक उपक्रमांना यश मिळते.' असे सांगून स्वेरीच्या रासेयोतील अधिकारी, पदाधिकारी व विद्यार्थ्यांची पाठ थोपटली. या कार्यशाळेत उमा महाविद्यालय पंढरपूर, यशवंतभाऊ पाटील महाविद्यालय भोसे, दलित मित्र कदम गुरुजी महाविद्यालय मंगळवेढा, स्वेरीज् कॉलेज ऑफ फार्मसी पंढरपूर व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग पंढरपूर या महाविद्यालयातील रासेयोचे विद्यार्थी सहभागी झाले होते. यावेळी प्रीती लोंढे, श्र्वेता माळी, उमेश मेटकरी, प्रा. दत्तात्रय माळी यांनी 'आपत्ती व्यवस्थापन' कार्यशाळेत आलेला अनुभव सांगितला. प्रवेश प्रक्रिया विभागाचे अधिष्ठाता प्रा.के.बी. पाटील म्हणाले की, 'धकाधकीच्या जीवनात रासेयोच्या अशा कार्यशाळेमुळे आपत्तीजनक परिस्थिती असताना संकटात देखील धीरोदात्तपणे उभे राहून संकटावर मात करता येते याचे शिक्षण मिळाले. यामुळे विद्यार्थ्यामधील आत्मविश्र्वास वाढला तसेच राष्ट्रनिर्मितीसाठी अशा उपक्रमाची गरज आहे.' असे सांगितले. ही कार्यशाळा यशस्वीपणे पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे वितरीत करण्यात आले. याप्रसंगी स्वेरीचे विद्यार्थी अधिष्ठाता डॉ.एम.एस. मठपती, रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. रविकांत साठे, डॉ. धनंजय चौधरी, डॉ. एम. एम. आवताडे, प्रा. एस.बी. खडके, प्रा. बी.टी. गडदे, प्रा.जी.जी. फलमारी, प्रा.सौ. पी. व्ही. पडवळे, प्रा.मेघा सोनटक्के, प्रा. एस. डी. माळी, फार्मसीचे प्रा. एच.बी.बनसोडे, इतर प्राध्यापक वर्ग व विद्यार्थी उपस्थित होते. प्रा. के.एस.पुकाळे यांनी सूत्रसंचालन केले तर कार्यक्रम अधिकारी डॉ. धनंजय चौधरी यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# नदीकाठच्या गावांना सहा तास वीज मिळणार

## जिल्हाधिकाऱ्यांकडून आमदार आवताडेंची मागणी मान्य

मंगळवेढा/प्रतिनिधीः दुष्काळाची तीव्रता दिवसेंदिवस वाढतच असून लोकांना पिण्याच्या पाण्यासाठी ही धावा धाव करावी लागत आहे अशा परिस्थितीमध्ये भीमा नदीमध्ये पिण्यासाठी उजनी धरणातून पाणी सोडले आहे मात्र त्या नदीकाठचा विद्युत पुरवठा फक्त दोनच तासच सुरू असून त्या दोन तासांमध्ये शेतकऱ्यांना पुरेसं पाणी मिळत नाही अनेक शेतकऱ्यांच्या पाच ते दहा किलोमीटर अंतर पाईपलाईन आहेत दोन तासांमध्ये त्या पाईपलाईन मधून पाणीही बाहेर पडेनासे झाले आहे त्यामुळे रोज दोन तास वीज पुरवठा सोडण्याऐवजी किमान एक दिवसाआड आठ तास तरी वीज पुरवठा उपलब्ध करून देण्याच्या सूचना द्याव्यात अशी मागणी आमदार समाधान आवताडे यांनी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्याकडे निवेदनाद्वारे केली होती, त्यांचबरोबर दूरध्वनी वरून चर्चा करून चर्चेअंती मार्ग काढत जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दररोज सहा तास वीज पुरवठा सुरू करण्याचे मान्य करत तशा सूचना महावितरण विभागास दिल्या असल्याचे आमदार समाधान आवताडे यांनी सांगितले.



आमदार समाधान आवताडे यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी करताना असे म्हटले होते की उन्हाची दाहकता वाढत असून नागरिक व जनावरांचे पिण्याच्या पाण्यासाठी अतोनात हाल होत आहेत प्रशासनाने काही भागात दोन तास तर काही भागात चार तास विद्युत पुरवठा चालू ठेवलेला आहे मात्र या दोन व चार तासाच्या कालावधीमध्ये पुरेसा विद्युत प्रवाह उपलब्ध होत नसल्याने शेतकऱ्यांना त्याचा नाहक त्रास सहन करावा लागत आहे त्यामुळे ग्रामीण भागातील शेतकरी माझ्याकडे दोन व चार तासाऐवजी सलग आठ तास विद्युत पुरवठा द्यावा अशी लेखी निवेदनाद्वारे मागणी करत आहेत महावितरण विभागाकडून सुरू असलेल्या दोन व चार तास विद्युत पुरवठा ऐवजी एक दिवस सलग आठ तास विद्युत पुरवठा झाल्यास शेतकऱ्यांच्या व जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा त्रास कमी होऊन त्यांना दैनंदिन कामाचे नियोजन करता येईल तरी भीमा नदीकाठच्या शेतकऱ्यांना एक दिवसाआड सलग आठ तास विद्युत पुरवठा करण्यासाठी महावितरण विभागास आदेश देण्यात यावेत अशा आशयाचे निवेदन आमदार समाधान आवताडे यांनी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांना दिले होते त्याचबरोबर वारंवार दूरध्वनी वरूनही चर्चा केली होती त्यानुसार जिल्हाधिकारी यांनी दररोज सहा तास वीज पुरवठा सुरू ठेवण्याच्या सूचना महावितरण विभागास दिल्या असल्याचे आमदार आवताडे यांनी बोलताना सांगितले

# विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार यांनी केली विविध विकास कामांची पाहणी

पंढरपूर/प्रतिनिधीः पालखी सोहळ्यासोबत येणाऱ्या भाविकांना तसेच पंढरपूरात येणाऱ्या भाविकांना आवश्यक व दर्जेदार सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी तीर्थक्षेत्र विकास आराखड्यातर्गंत करण्यात आलेल्या विविध कामांची पाहणी विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार यांनी केली.



यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, अपर जिल्हाधिकारी मोनिका सिंह, विभागीय आयुक्त नगर प्रशासनाच्या सहआयुक्त पुनम मेहता, जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार, सार्वजनिक बांधकामचे अधिक्षक अभियंता संजय माळी, विभागीय आयुक्त कार्यालयाचे विशेष कार्य अधिकारी राजेश तितर, प्रांताधिकारी सचिन इथापे, उपविभागीय पोलीस अधिकारी अर्जुन भोसले, तहसीलदार सचिन लंगोटे, भिमा कालवा मंडळाचे अधिक्षक अभियंता ज्ञानदेव बागडे, गटविकास अधिकारी सुशील संसारे कार्यकारी अभियंता अमित निमकर, मुख्याधिकारी प्रशांत जाधव, उपआयुक्त आशिष लोकरे ,उपमुख्याधिकारी सुनील वाळूजकर संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

यावेळी विभागीय आयुक्त पुलकुंडवार म्हणाले, चंद्रभागा नदीचे पावित्र्य टिकावे यासाठी वेळोवेळी चंद्रभागा नदी पात्राची स्वच्छता करण्यात यावी. भाविकांनी व नागरिकांनी निर्माल्य, कचरा नदीपात्रात टाकू नये यासाठी सूचना फलक लावावेत. तसेच लाऊड स्पिकरव्दारे सूचना देण्यात याव्यात. वारी व्यतिरिक्त दररोज पंढरपूरात येणाऱ्या भाविकांची संख्या लक्षात घेता आवश्यक ठिकाणी मोबाईल टॉयलेटची उपलब्धता ठेवावी. तसेच भाविकांसाठी प्रशासनाकडून देण्यात आलेल्या सुविधाबाबतचे माहिती फलक लावावेत.

आषाढी यात्रा कालावधीत पावसाची शक्यता असल्याने ६५ एकर येथील प्लॉटवर चिखल होणार नाही यासाठी उपाययोजना कराव्यात अशा सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.

विभागीय आयुक्त पुलकुंडवार यांनी अकलूज, वेळापूर भंडीशेगाव वाखरी येथील पालखी तळांची तसेच नाम संकीर्तन सभागृह ,पंढरपूर येथील विठ्ठल रुक्मिणी मंदिर, घाट, चंद्रभागा वाळवंट, ६५ एकर, गोपाळपूर येथील जलशुध्दीकरण प्रकल्पाची पाहणी केली.

यावेळी विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार यांनी पालखी सोहळ्या सोबत येणाऱ्या वारकरी भाविकांसाठी प्रशासनाकडून कोणत्या सुविधा उपलब्ध केल्या जातात याची माहिती घेऊन अधिकच्या सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत नियोजन करावे अशा सूचना दिल्या.

वाखरी पालखी तळावरील मधोमध असणाऱ्या विद्युत वाहक तारा व खांब एका बाजूला सुरक्षित स्थळी लावण्यात यावेत. तसेच वारी कालावधीत भाविकांसाठी आरोग्य सुविधा, पिण्याचे पाणी, सुरक्षा, विद्युत व्यवस्था, गर्दी व्यवस्थापन, दर्शन व्यवस्था आदीबाबतीची माहिती घेवून आवश्यक सूचना त्यांनी केल्या.

यावेळी प्रांताधिकारी सचिन इथापे यांनी वारकरी-भाविकांना प्रशासनाकडून देण्यात येणाऱ्या सोयी सुविधांची माहिती दिली. मंदीर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी मंदीर समिती कडून देण्यात येणाऱ्या सुविधांची माहिती दिली तर वारी कालावधतीत पोलीस प्रशासनाकडून भाविकांच्या सुरक्षेसाठी करण्यात येणाऱ्या उपाययोजनांची माहिती दिली.

# गुडीपाडवा व चैत्री यात्रेत पूर्णवेळ मुखदर्शन; चैत्री यात्रेत पुरेसा व अत्याधुनिक सोई सुविधा : गहिनीनाथ महाराज औसेकर

पंढरपूर/प्रतिनिधीः चैत्री यात्रा दरवर्षी चैत्र शुध्द ११ कामदा एकादशी या दिवशी भरते. सन २०२४ यावर्षी चैत्री यात्रा शुक्रवार, दिनांक १९ एप्रिल, २०२४ रोजी आहे. तथापि, श्रींच्या गर्भगृहातील संवर्धनाचे काम सुरू असल्याने सद्यस्थितीत श्रींचे पदस्पर्शदर्शन बंद करून फक्त पहाटे ५.०० ते सकाळी ११.०० पर्यंत मुखदर्शन भाविकांना उपलब्ध करून देण्यात येत आहे. मात्र, चैत्री यात्रेला होणारी भाविकांची गर्दी विचारात घेऊन, दिनांक १५ ते २१ एप्रिल, २०२४ या कालावधीत पहाटे ५.०० ते रा.११.०० पर्यंत फक्त मुखदर्शन उपलब्ध करून देण्यात येणार आहे. तसेच दिनांक ०९ एप्रिल, २०२४ रोजी गुढीपाडवा सण साजरा होत असून, साडेतीन मुहुर्तापैकी एक असलेल्या,



या सणाला भाविकांची मोठ्या प्रमाणात होणारी गर्दी विचारात घेऊन, या दिवशी पहाटे ५.०० ते रा.११.०० पर्यंत फक्त मुखदर्शन उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या यात्रेला येणा-या भाविकांना पुरेसा व अत्याधुनिक सोईसुविधा देण्याबाबत मंदिर समितीचे प्राधान्य राहणार असल्याची माहिती सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली. दिवसेंदिवस उष्णतेची वाढणारी दहाकता लक्षात घेता, दर्शनरांगेत स्पिंकरल, कुलर, थंड पिण्याचे पाणी, सरबत, मठ्ठा वाटप करण्यात येणार आहे. याशिवाय, पत्राशेड व दर्शनमंडप येथे आरोग्य विभागाचा वैद्यकीय कक्ष, उपजिल्हा रूग्णालया मार्फत दर्शनमंडप येथे आयसीयू तसेच वैष्णव चॅरीटेबल ट्रस्ट, मुंबई यांच्याकडून मोफत वैद्यकीय सेवा उपलब्ध राहणार आहे. मंदिर परिसरात वैद्यकीय पथकासह दोन अद्यावत रूग्णवाहिका ठेवण्यात येत आहेत.

दिनांक ०५ एप्रिल, २०२४ रोजी दुपारी १.०० वाजता सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या अध्यक्षतेखाली सभा संपन्न झाली. या सभेस सदस्या शकुंतला नडगिरे, डॉ.दिनेशकुमार कदम, ह.भ.प.प्रकाश जवंजाळ, दूरदृष्य प्रणालीद्वारे ह.भ.प.ज्ञानेश्र्वर देशमुख जळगांवकर, कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, व्यवस्थापक बालाजी पुदलवाड, दूरदृष्य प्रणालीद्वारे पुरातत्व विभागाचे सहायक संचालक विलास वाहणे व वास्तुविशारद तेजस्विनी आफळे उपस्थित होत्या. सभेच्या सुरवातीला मंदिर जतन व संवर्धनातील कामाची पाहणी करण्यात आली व संवर्धनाची कामे वेळेत व दर्जेदार करावीत अशा सुचना पुरातत्व विभाग, वास्तुविशारद व ठेकेदार यांना देण्यात आल्या. चैत्री यात्रेत दिनांक १५ ते २१ एप्रिल, २०२४ या कालावधीत पहाटे ५.०० ते रा.११.०० पर्यंत फक्त मुखदर्शन उपलब्ध करून देण्यात येणार आहे. गर्भगृहाचे काम सुरू असल्याने, पदस्पर्शदर्शन बंद आहे. त्यामुळे पदस्पर्शदर्शन सुरू होईपर्यंत भाविकांच्या हस्ते पुजा बंद करण्यात आलेल्या आहेत. नजीकच्या काळात होणारी चंदनउटी पुजा देखील मंदिर समिती मार्फत करण्यात येणार असल्याचे कार्यकारी अधिकारी यांनी सांगीतले.

# उगाव हायस्कूलच्या दोन विद्यार्थ्यांची नवोदय व सैनिकी विद्यालयामध्ये निवड



निफाड/प्रतिनिधीः निफाड तालुक्यातील उगाव येथील महाराष्ट्र शिक्षण संस्था संचलित,छत्रपती शिवाजी हायस्कूल व दिनकरराव पानगव्हाणे कनिष्ठ महाविद्यालय,उगाव हायस्कूल ने यशाची परंपरा कायम ठेवली.उगाव हायस्कूल मधील इयत्ता पाचवी मधील मल्हार शंकर सांगळे या विद्यार्थ्याची खेडगाव ता. दिंडोरी येथील जवाहर नवोदय विद्यालयासाठी निवड झाली तर आराध्या संदीप ढेपले या विद्यार्थिनीची सैनिकी विद्यालय,सातारा येथे निवड झाली आहे. सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षात जवाहर नवोदय विद्यालय व सैनिकी विद्यालय , सातारा निवड समितीतर्फे घेण्यात आलेल्या परीक्षेचा निकाल व प्रथम गुणवत्ता यादी नुकतीच जाहीर झाली होती. त्यामध्ये उगाव हायस्कूलमधील या दोन विद्यार्थ्यांनी स्थान मिळवले आहे.

या विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल निफाड पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी डॉ. विजय बागुल. विस्तार अधिकारी वसंतराव गायकवाड. केंद्रप्रमुख भास्करराव भदाणे.किरण निंबेकर यांसह महाराष्ट्र शिक्षण संस्थेचे

अध्यक्ष गुलाबराव जोंधळे, उपाध्यक्ष निवृत्ती थेटे, सचिव दत्तात्रय जोंधळे, कार्यकारी संचालक दिपकराव जोंधळे, यांसह विद्यालयाचे प्राचार्य कैलास गवळी,पर्यवेक्षक नंदराम ढिकले, वनसगाव विद्यालयाचे प्राचार्य सी डी रोटे, शंकर सांगळे,सोनल पल्हाळे आदींसह मान्यवरांनी अभिनंदन केले आहे.